**कराड विमानतळ परिसरातील बांधकाम करणेसाठी उंचीबाबत ना- हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबतची कार्यप्रणाली व अर्जदारांसाठीच्या मार्गदर्शक सूचना**

१) नागरी विमान वाहतूक मंत्रालय, भारत सरकार यांनी विमानतळांची सुरक्षा व त्यावरून विना अडथळा सुरक्षित उड्डाणे होण्यासाठी म्हणून आंतर राष्ट्रीय मानांकने व नियम विचारात घेऊन GSR751E दिनांक ३०/०९/२०१५ रोजी सूची तयार करून ती राजपत्रात प्रकाशित केली आहे व तसेच विना परवाना विमानतळांसाठी म्हणून ADSAC -०५, वर्ष २०२१ या सूचना दिनांक २४/०३/२०२१ रोजी प्रसिद्ध केलेल्या आहेत.

२) नागरी विमान वाहतूक मंत्रालयामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या सूचनांच्या आधारे महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी मार्फत कराड विमानतळासाठीचा कलर कोडेड झोनिंग नकाशा तयार केला आहे. पीडीफ स्वरूपातील सदर नकाशाची प्रत म.वि.वि. कंपनीमार्फत संकेत स्थळावर उपलब्ध करून दिलेली आहे. तसेच सदर कलर कोडेड झोनिंग नकाशा गुगल अर्थ या प्रणाली वर पाहण्यासाठी म्हणून त्या साठी देखील लिंक उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

३) अर्जदारांनी प्रथम कलर कोडेड झोनिंग नकाशावर त्यांच्या जागेचे स्थान कुठल्या रंगाच्या झोन मध्ये व कुठल्या ग्रीड क्रमांकामधे येते ते पहावे. कलर कोड झोनिंग नकाशा मध्ये कराड विमानतळ सभोवतालचा परिसर हा फिकट लाल, जांभळा, निळा, पिवळा, हिरवा, इत्यादी रंगांमध्ये ग्रीड क्रमांकनिहाय विभागून दर्शविण्यात आलेला आहे. या प्रत्येक विभागामध्ये समुद्र सपाटीपासून जास्तीतजास्त किती उंची पर्यंत एखाद्या इमारतीचे बांधकाम /मनोरा इत्यादी उभारणी करण्यास परवानगी आहे, हे नमूद करण्यात आलेले आहे. एखाद्या व्यक्तीस या नकाशामध्ये नमूद केलेल्या उंची पेक्षा जास्त उंच बांधकाम करावयाचे असल्यास या कार्यप्रणाली मध्ये नमूद केल्यानुसार उंचीबाबतचे ना - हरकत प्रमाणपत्र घेणे व त्याला अनुसार बांधकाम करणे अनिवार्य आहे.

४) या शिवाय, जर अर्जदाराची मिळकत हि कलर कोडेड झोनिंग नकाशामधील फिकट लाल रंगाने दर्शविण्यात आलेल्या क्षेत्रामध्ये येत असेल तर अशा अर्जदारांनी भारतीय विमानपत्तन प्राधिकरणामार्फत (AAI मार्फत ) ना -हरकत प्रमाण पत्र घ्यावे, असे नकाशामध्ये नमूद करण्यात आलेले आहे. परंतु, कराड विमानतळ हा विना परवाना विमानतळ (Un Licensed Airport) असल्याने **भारतीय विमानपत्तन प्राधिकरणाच्या सूचनांनुसार, कलर कोडेड झोनिंग नकाशामधील सदर फिकट लाल रंगाने दर्शविण्यात आलेल्या क्षेत्रासाठी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडून उंची बाबतचे ना -हरकत प्रमाण पत्र देण्यात येईल.**

५) फिकट लाल रंगाने दर्शविण्यात आलेल्या विभागातील जमिनीच्या उंचीबाबतचे ना हरकत प्रमाणपत्र महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडून प्राप्त करण्यासाठी या संकेत स्थळावर नमूद केल्यानुसार अर्जदाराला सर्व कागद पत्रे ऑनलाईन पद्धतीने **"karadnoc@gmail.com"** या ई-मेल आयडी वर पाठवायची आहेत.

६) म. वि. वि. कंपनीकडे अर्ज करण्यासाठी अर्जदाराला खालील कागदपत्रे ऑनलाईन पद्धतीने जमा करावयाची आहेत -

I. विहित नमुन्यानुसारचा अर्ज,
II. जागेची समुद्र सपाटीपासूनची उंची व त्याचे विहित पद्धतीने अक्षांश व रेखांश दर्शविणारा विहित नमुन्यानुसारचा परवानाधारक वास्तुविशारद/ अभियंता / सर्वेअर यांच्यामार्फत सादर करावयाचा तपशील,
III. प्रकरण निहाय आवश्यक विहित नमुन्यानुसारची प्रतिज्ञापत्रे

७) अर्जदाराच्या जागेच्या स्थानानुसार, उंचीबाबतचे ना - हरकत प्रमाण पत्र प्राप्त करण्याच्या कार्यपद्धतीची पुढील दोन प्रकारामध्ये विभागणी करण्यात आलेली आहे –

अ) कलर कोडींग झोनींग नकाशामधील **फिकट लाल रंगाच्या झोन** मध्ये समाविष्ट असणाऱ्या मिळकतींसाठी अवलंबिण्यात येणारी कार्यपद्धती -

ब) कलर कोडींग झोनींग नकाशामधील **जांभळा, निळा, पिवळा, हिरवा, इत्यादी या रंगांच्या झोन** मध्ये समाविष्ट असणाऱ्या मिळकतींसाठी अवलंबिण्यात येणारी कार्यपद्धती -

**अ) कलर कोडींग झोनींग नकाशामधील <u>फिकट लाल रंगाच्या</u> झोन मध्ये समाविष्ट असणाऱ्या मिळकतींसाठी अवलंबिण्यात येणारी कार्यपद्धती पुढीलप्रमाणे -**

१) या प्रकारातील मिळकतींसाठी अर्जदाराने परवानाधारक वास्तुविशारद/अभियंता/सर्वेअर यांच्यामार्फत महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडे **"karadnoc@gmail.com "** या ईमेल आयडी वर सर्व विहित नमुन्यातील कागदपत्रे स्कॅन करून सादर करावयाची आहेत.

२) अर्जाचा नमुना व इतर कागदपत्रांची यादी म.वि. वि. कंपनीमार्फत संकेत स्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे.

३) अर्जदारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज प्राप्त झाल्यावर सर्व कागद पत्रांची पडताळणी म.वि. वि. कंपनीमार्फत करण्यात येईल. सर्व कागद पत्रे परिपूर्ण असतील तरच अर्जदाराला अर्ज क्रमांक देण्यात येईल.

४) सदर अर्ज क्रमांक नमूद केलेल्या अर्जावर, म. वि. वि. कंपनिच्या तांत्रिक विभागामार्फत कार्यवाही करण्यात येईल व अर्जदाराच्या जागेसाठी अनुज्ञेय असलेली उंची अर्जदाराला ना - हरकत प्रमाणपत्राद्वारे कळविण्यात येईल.

५) सदर ना हरकत प्रमाणपत्राची प्रत इ-मेल द्वारे संबंधित अर्जदार, संबंधित वास्तुविशारद/अभियंता/सर्वेअर व बांधकाम परवानगी देणाऱ्या संबंधित स्थानिक नियोजन संस्था यांना पाठविण्यात येईल. या साठी या सर्वांचे अचूक ई-मेल आयडी अर्जामध्ये नमूद करणे गरजेचे आहे.

६) म. वि. वि. कंपनीमार्फत ना हरकत प्रमाणपत्राद्वारे अनुज्ञेय करण्यात आलेल्या उंचीपर्यंत किंवा त्या पेक्षा कमी उंचीपर्यंत अर्जदाराला बांधकाम करता येईल. अनुज्ञेय उंचीपर्यंतच बांधकाम होते आहे, याची खातरजमा संबंधित बांधकाम प्रकल्पाच्या वास्तुविशारद/अभियंता यांनी करावयाची आहे व त्या नुसार सदर अनुज्ञेय उंची विचारात घेऊन, सदर जागेवरील प्रस्तावित इमारतीचे नकाशे बनवून बांधकाम परवानगीचे अर्ज (बांधकाम सुरु करण्याचे प्रमाणपत्र व भोगवटा प्रमाणपत्र, इत्यादी साठीचे अर्ज) संबंधित स्थानिक नियोजन संस्थेकडे करावयाचे आहेत.

७) स्थानिक नियोजन संस्थांनी अर्जदाराचे बांधकाम हे अनुज्ञेय उंची पर्यंत किंवा त्या पेक्षा कमी आहे याची खातरजमा करून त्यानुसार संबंधित प्रकल्पाला बांधकाम परवानगी (बांधकाम सुरु करण्याचे प्रमाणपत्र व भोगवटा प्रमाणपत्र, इत्यादी) द्यावयाची आहे.

**ब) कलर कोडींग झोनींग नकाशामधील (<u>फिकट लाल रंगाव्यतिरिक्त इतर</u>) जांभळा, निळा, पिवळा, हिरवा, इत्यादी रंगांच्या झोन मध्ये समाविष्ट असणाऱ्या मिळकतींसाठी अवलंबिण्यात येणारी कार्यपद्धती पुढीलप्रमाणे -**

१) कराड विमानतळ कलर कोड झोनिंग नकाशा मध्ये फिकट लाल रंगाव्यतिरिक्त इतर जांभळा, निळा, पिवळा, हिरवा, इत्यादी रंगाच्या विभागामध्ये ग्रीड क्रमांकनिहाय समुद्र सपाटीपासून जास्तीतजास्त किती उंची पर्यंत एखाद्या इमारतीचे बांधकाम /मनोरा, इत्यादी उभारणी करण्यास परवानगी आहे, हे नमूद करण्यात आलेले आहे.

२) अर्जदाराला रंगानुसार (फिकट लाल रंगाव्यतिरिक्त, फक्त जांभळा, निळा, पिवळा, हिरवा, इत्यादी रंगांमधील झोनसाठी/ग्रीडसाठी) **अनुज्ञेय उंची पर्यंत किंवा त्याहून कमी उंचीचे बांधकाम करावयाचे असल्यास त्या बांधकामासाठी कुठल्याही ना हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता नाही.**

३) रंगानुसार नकाशामध्ये नमूद केलेल्या उंची पेक्षा जास्त उंच बांधकाम करावयाचे असल्यास, सदर अर्जदाराला संबंधित स्थानिक नियोजन संस्थेकडे ना हरकत प्रमाणपत्रासाठी अर्ज करावयाचा आहे.

४) अर्जदाराला सर्व कागदपत्रांसह ना हरकत प्रमाणपत्रासाठीचा अर्ज संबंधित स्थानिक नियोजन प्राधिकरणाकडे करावयाचा आहे. म.वि.वि. कंपनीच्या सहकार्याने, स्थानिक नियोजन प्राधिकरण सदर अर्जावर कार्यवाही करून संबंधित अर्जदाराला ना हरकत प्रमाणपत्र देईल.

५) स्थानिक नियोजन प्राधिकारणांकडून देण्यात येणाऱ्या ना-हरकत प्रमाणपत्रांच्या संख्येची नोंद सदर स्थानिक संस्थेमार्फत ठेवण्यात येईल व त्याचा तपशील सदर संस्थेमार्फत म.वि.वि. कंपनीला कळविण्यात येईल.

६) नकाशामध्ये नमूद अनुज्ञेय उंचीनुसार किंवा स्थानिक नियोजन संस्थेने दिलेल्या ना हरकत प्रमाणपत्रानुसार अर्जदाराला बांधकाम करणे अनिवार्य असेल. अनुज्ञेय उंचीपर्यंतच बांधकाम होते आहे, याची खातरजमा संबंधित

बांधकाम प्रकल्पाच्या वास्तुविशारद/अभियंता यांनी करावयाची आहे व त्या नुसार सदर अनुज्ञेय उंची विचारात घेऊन, सदर जागेवरील प्रस्तावित इमारतीचे नकाशे बनवून बांधकाम परवानगीचे अर्ज (बांधकाम सुरु करण्याचे प्रमाणपत्र व भोगवटा प्रमाणपत्र, इत्यादी साठीचे अर्ज) संबंधित स्थानिक नियोजन संस्थेकडे करावयाचे आहेत.

७) स्थानिक नियोजन संस्थांनी अर्जदाराचे बांधकाम हे अनुज्ञेय उंची पर्यंत किंवा त्या पेक्षा कमी आहे याची खातरजमा करून त्यानुसार संबंधित प्रकल्पाला बांधकाम परवानगी (बांधकाम सुरु करण्याचे प्रमाणपत्र व भोगवटा प्रमाणपत्र, इत्यादी) द्यावयाची आहे.

= = = =